SANJAY KAKADE GROUP

जाहिरात



# अँटीग्रॅव्हिटी योगा आता शहरात

Saturday, 07 February 2015 AT 02:16:16 PM



महिलांचा एक लहानसा गट छतापासून हवेत लटकतो आहे, त्यांचा देह हवेमध्ये वक्राकार ताणत. पाऊले वर सरळ ताणलेली आणि पाय बाहेरच्या बाजूला ताणलेले, त्या हवेतच मागे वाकतात आणि 'दी स्वान' नावाची रचना तयार करतात. राफटरवर झुलणा-या त्या प्रसन्न आणि सुंदर दिसत आहेत.

या महिला हवेतील योग ज्याला अँटीग्रॅव्हिटी असे नाव आहे त्याचा सराव करीत आहेत. योगा करण्याचा नवीन प्रकार आहे, ज्यामध्ये रेशमी कापड छताला टांगलेले असते आणि त्यावर ओळंबून गुरूत्वाकर्षणाच्या साहाय्याने हवेतच आधांतरी वेगवेगळी आसने करता येऊ शकतात. पुण्यामधील बायोरिदम हे पुण्यातील प्रथम अँटीग्रॅव्हिटी सेंटर आहे. नितल रावल यांनी सुरू केलेल्या बाणेर येथील बायोरिदम सेंटरमध्ये फिटनेस विषयी उत्साही असलेल्यांना हा रोमांचक योग प्रकार शिकता येईल.

अँटीग्रॅव्हिटी हवेतील योग आणि फिटनेस तसेच हवेतील इतर योगप्रकारांचे प्रणेते ख्रिस्तोफर हॅरिसन, यांनी या खास प्रकारच्या कसरतीचा 1990 साली पुरस्कार केला.

**अँटीग्रॅव्हिटी विषयी:**

1991 मध्ये स्थापित अँटीग्रॅव्हिटीचे मुख्यालय आणि फिटनेस प्रशिक्षण केंद्र मिडटाऊन मॅनहॅटनमध्ये आहे. ओरलँडो, फ्लोरिडा येथे अँटीग्रॅव्हिटी थिएटर आणि नॅशनल एरिअल परफॉर्मन्स प्रशिक्षण केंद्र आहे जेथे दीर्घ कालीन कार्यक्रम चालू असतात. अँटीग्रॅव्हिटी संघ जगभरात 80 शारीरिक मनोरंजन कलाकार आणि शेकडो अँटीग्रॅव्हिटी फिटनेस प्रशिक्षण मार्गदर्शकांच्या तांफ्याचे नियोजन करतो.

**अँटीग्रॅव्हिटीचा निर्माता - ख्रिस्तोफर हॅरिसन विषयी:**

ख्रिस्तोफर हॅरिसन हा अँटीग्रॅव्हिटी या जगप्रसिध्द मनोरंजन आणि फिटनेस ब्रँडचा संस्थापक

आणि निर्माता आहे.  कंपनीचा कलात्मक संचालक म्हणून त्याने, ब्रॉडवेपासून ते ऑलिम्पिक ते अकादमी पुरस्कार ते डिस्ने चित्रपट ते मेट्रोपोलिटीन ऑपेरा ते फ्लॅश मॉब, यासाठी 400 मनोरंजक प्रस्तुती केल्या आहेत.  2009 मध्ये बराक ओबामांच्या अध्यक्षीय उद्घाटन सोहळ्यात, अ श्रेणीच्या ख्यातनाम कलाकारांबरोबर सादरीकरणासाठी आमंत्रण मिळालेला, त्याचा एकमेव न गाणारा संघ होता.

हॅरिसनने, रिहन्ना, पिंक, मारिया कारी, पी. डिड्डी, नेल्ली, कॅनी वेस्ट, ब्रिटनी स्पिअर्स, ग्वेन स्टेफनी, फ्रॅन्को ड्रॅगोन, जॉर्ज लुकास, पॉल न्युमन, बिल गेटस्, स्टीव्ह फोर्बस्, रिचर्ड ब्रॅन्सन, जॉर्ज सोरोस, जिऑरजिओ अरमानी, मार्क जेकॉबज्, हाल प्रिन्स, फ्रॅन्को जेफ्फिरेल्ली आदी जगभरातील अनेक प्रसिध्द सितार्यांसाठी आणि दी व्हाईट हाऊससाठी मनोरंजनाचे कार्यक्रम तयार केले आहेत.  अँटीग्रॅव्हिटीचा संचालक म्हणून त्याने मेट्रोपॉलिटन ऑपेरा हाऊससाठी (दहा हंगाम), रेडिओ सिटी म्युझिक हॉल (तीन हंगाम), सहा ब्रॉडवे कार्यक्रम (2 टोनी पुरस्कारासाठी मदत), असंख्य टीव्ही स्पेशल्स आणि ऑस्कर, व्हीएमए आणि ग्रॅमी सारखे पुरस्कारांचे कार्यक्रम तसेच एनएफएल, एनबीए आणि दोन ऑलिम्पिक खेळांसाठी कार्यक्रम तयार केले आहेत.  क्रिस्तोफरने विशिष्ट साधनांच्या साहाय्याने केलेल्या हालचालींचा शब्दकोश तयार केला आहे ज्याला जगभरात मान्यता मिळाली आहे.  एक हवेतील कसरतींचा रचनाकार म्हणून ब्रॉडवेसाठी बंजी ट्रॅक संरचना करून, बंजी नृत्य तंत्रज्ञान तयार करण्यात त्याचा मोलाचा वाटा आहे.



Copyright © 2014 Aplapune.